L. A. BILL No. XXXI OF 2026.

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND TO RE-ENACT CERTAIN RULES RELATING TO FIXATION OF CAPITAL VALUE, LEVY AND COLLECTION OF PROPERTY TAX WITH RETROSPECTIVE EFFECT.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१.

भूतलक्षी प्रभावाने, मुंबई महानगरपालिका अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता आणि भांडवली मूल्य निश्चित करणे, मालमत्ता कर बसविणे व गोळा करणे यांच्याशी संबंधित असणारे विवक्षित नियम पुनर्अधिनियमित करण्याकरिता विधेयक.

(विधानसभेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)

(विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)

१८८८ चा ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, भूतलक्षी प्रभावाने, मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करणे आणि उक्त अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये केलेले भांडवली मूल्य निश्चित करणे,

मालमत्ता कर बसविणे व गोळा करणे यांच्याशी संबंधित असणारे विवक्षित नियम पुनर्अधिनियमित करणे आणि त्याच्या विवक्षित तरतुदींचे विधिग्राह्यीकरण करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्यविषयक नियमांचे पुनर्अधिनियमन व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

१८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५४ मधील, पोट-कलमे (१अ) व (१ब) यांऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील आणि ती, १ एप्रिल २०१० पासून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल :— १८८८ चा ३.

"(१अ) मालमत्ता कर आकारला जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही जमिनीचे किंवा इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या दृष्टीने, आयुक्त, अशा जमिनीचे किंवा इमारतीचे पुढीलप्रमाणे, विनिर्दिष्ट केलेले मूल्य व घटक विचारात घेईल :—

(१) जमिनीचे किंवा इमारतीचे मूल्य.–

(अ) जमिनीच्या बाबतीत, आधारभूत मूल्य म्हणून, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींन्वये केलेल्या, महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम, १९९५ अन्वये प्रसिद्ध केलेल्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या दरांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश, "दरांचे वार्षिक विवरणपत्र" असा केला आहे), दर्शविलेला कोणत्याही जमिनीचा सरासरी दर ; आणि १९५८ चा ६०.

(ब) इमारतीच्या बाबतीत, आधारभूत मूल्य म्हणून, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या दरांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये दर्शविलेला कोणत्याही इमारतीचा सरासरी दर :

परंतु, जेव्हा दरांच्या वार्षिक विवरणपत्रात, ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत भांडवली मूल्य निर्धारित करावयाचे आहे ती जमीन किंवा इमारत ज्या क्षेत्रामध्ये स्थित आहे त्या कोणत्याही विशिष्ट क्षेत्रामधील कोणत्याही मालमत्तेचे मूल्य दर्शविण्यात आलेले नसेल, अथवा असे दरांचे वार्षिक विवरणपत्र तयार केलेले नसेल किंवा ते उपलब्ध नसेल तर, आयुक्त, या पोट-कलमाच्या तरतुदींनुसार, अशा जमिनीचे किंवा इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या दृष्टीने, आधारभूत मूल्य म्हणून, दरांच्या वार्षिक विवरणपत्रातील जमिनीच्या किंवा इमारतीच्या सरासरी दरांच्या जागी, अशा जमिनीचे किंवा इमारतीचे बाजारमूल्य विचारात घेईल ; आणि

(२) घटक.—

(अ) जमिनीच्या बाबतीत,—

(एक) जमिनीचे स्वरूप व प्रकार ;

(दोन) जमिनीचे क्षेत्रफळ ;

(तीन) वापरकर्ता प्रवर्ग, जसे की, (एक) औद्योगिक, (दोन) निवासी, (तीन) वाणिज्यिक, आणि वरीलपैकी कोणत्याही प्रवर्गामध्ये समाविष्ट नसलेले वापरकर्त्यांचे अन्य कोणतेही प्रवर्ग ; किंवा

(चार) पोट-कलम (१ब) अन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येतील असे अन्य कोणतेही घटक.

(ब) इमारतीच्या बाबतीत,—

(एक) इमारतीचे स्वरूप, प्रकार व संरचना ;

(दोन) १ एप्रिल २०१० पासून सुरू होणाऱ्या ते ३१ मार्च २०१५ या कालावधीसाठी इमारतीचे बांधीव क्षेत्र आणि १ एप्रिल २०१५ पासून इमारतीचे चटई क्षेत्र ;

(तीन) वापरकर्ता प्रवर्ग जसे की, (एक) निवासी, (दोन) वाणिज्यिक (दुकाने किंवा तत्सम), (तीन) कार्यालये, (चार) हॉटेल (४ तारांकितपर्यंत), (पाच) हॉटेल (४ तारांकितपेक्षा अधिक), (सहा) बँका, (सात) उद्योग व कारखाने, (आठ) शाळा व महाविद्यालयीन इमारती किंवा शैक्षणिक प्रयोजनांसाठी वापरण्यात येणारी इमारत, (नऊ) मॉल्स, आणि (दहा) वरीलपैकी कोणत्याही प्रवर्गांमध्ये मोडत नसलेल्या इमारतीच्या वापरकर्त्यांचे अन्य कोणतेही प्रवर्ग ;

(चार) इमारतीचे वय ; किंवा

(पाच) पोट-कलम (१ब) अन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येतील असे अन्य कोणतेही घटक.

(१ब) आयुक्त, पोट-कलम (१अ) अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, स्थायी समितीच्या मान्यतेने, जमिनीचे किंवा इमारतीचे प्रवर्ग, अथवा जमिनीचे किंवा इमारतीचे इतर कोणतेही घटक यांचे तपशील, अशा विविध घटकांसाठी नेमून द्यावयाचे बहुविध भारांक (weightage by multiplication), जमिनीचे किंवा इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य निश्चित करण्याचे सूत्र व इतर कोणत्याही बाबी, विहित करण्यासाठी असे नियम, एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, तयार करील.".

भुतलक्षी प्रभावाने, भांडवली मूल्य नियम, २०१० याची सुधारणा आणि त्याचा नियम २१ पुनर्अधिनियमित करणे.

३. (१) कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, इमारतींच्या आणि जमिनींच्या वापरकर्त्यांच्या घटकांना व प्रवर्गांना (बहुविध भारांक देणे) भांडवली मूल्य निश्चित करणे नियम, २०१० (यात यापुढे ज्यांचा निर्देश, "भांडवली मूल्य नियम, २०१०" असा केला आहे) हे, १ एप्रिल, २०१० पासून भूतलक्षी प्रभावाने यथोचितरीत्या व वैधपणे करण्यात आले असल्याचे मानण्यात येतील आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या कलम १५४ ची पोट-कलमे (१अ) व (१ब) अन्वये आयुक्ताद्वारे, जणू काही ते, कायद्यानुसार करण्यात आलेले आहेत असे समजून, सर्व महत्त्वाच्या वेळी, अंमलात असल्याचे मानण्यात येतील.

(२) भांडवली मूल्य नियम, २०१० यात, पुढीलप्रमाणे, सुधारणा करण्यात येतील आणि त्या सुधारणा, १ एप्रिल २०१० पासून करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल :—

(क) भांडवली मूल्य नियम, २०१० याच्या नियम २ मध्ये,—

(एक) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क-१) "दरांचे वार्षिक विवरणपत्र" याचा अर्थ, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या १९५८ चा ६०. तरतुदींन्वये केलेले, महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम, १९९५ अन्वये प्रसिद्ध केलेले व त्या त्या वेळी अंमलात असलेले दरांचे वार्षिक विवरणपत्र, असा आहे;";

(दोन) खंड (ज) वगळण्यात येईल ;

(तीन) खंड (झ) मधील, "सिद्ध गणकामध्ये" या मजकुराऐवजी, "दरांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) भांडवली मूल्य नियम, २०१० याच्या नियम १३ मधील, "सिद्ध गणकामध्ये" या मजकुराऐवजी, "दरांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ग) भांडवली मूल्य नियम, २०१० याच्या नियम १८ मधील, "सिद्ध गणक" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, "दराचे वार्षिक विवरणपत्र" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

(घ) भांडवली मूल्य नियम, २०१० याचे नियम २० व २२ वगळण्यात येतील.

(३) कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, भांडवली मूल्य नियम, २०१० याचा नियम २१ हा, विवक्षित फेरबदलांसह यथोचितरीत्या व वैधरीत्या पुनर्अधिनियमित करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल, आणि तो, अंमलात असण्याचे कधीही बंद झालेले नव्हते असे मानण्यात येईल, आणि तो, १ एप्रिल २०१० पासून पुढीलप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील :—

"भांडवली मूल्य नियम, २०१० याच्या नियम २१ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"**२१.** खुल्या जमिनीचे किंवा इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य.— खुल्या जमिनीचे किंवा इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य, अधिनियमाच्या कलम १५४ ची पोट-कलमे (१अ) व (१ब) यांच्या तरतुदी आणि हे नियम या अन्वये, पुढील रीतीने निश्चित करण्यात येतील :—

(१) खुल्या जमिनीचे भांडवली मूल्य (**सीव्ही**).—

दरांच्या वार्षिक विवरणपत्रानुसार खुल्या जमिनीचा सरासरी दर (आधारभूत दर-बीआर) × वापरकर्त्याच्या प्रवर्गानुसार (युसी) बहुविध भारांक (अनुसूची 'अ' चा भाग एक) × जमिनीचे क्षेत्रफळ (एएल).

सीव्ही = बीआर × युसी × एएल.

(२) इमारतीचे भांडवली मूल्य **(सीव्ही)**.—

दरांच्या वार्षिक विवरणपत्रानुसार इमारतीचा सरासरी दर (आधारभूत दर-बीआर) × वापर-कर्त्याच्या प्रवर्गानुसार (युसी) बहुविध भारांक (अनुसूची 'अ' चा भाग दोन, तीन, किंवा यथास्थिति, भाग चार) × इमारतीचे स्वरूप व प्रकार (एनटीबी) यानुसार बहुविध भारांक (अनुसूची 'ब') × इमारतीच्या वयानुसार (एएफ) बहुविध भारांक (अनुसूची 'क') × मजल्या नुसार (एफएफ) बहुविध भारांक (अनुसूची 'ड') × बांधीव क्षेत्र (बीए).

सीव्ही = बीआर × युसी × एनटीबी × एएफ × एफएफ × बीए".".

भूतलक्षी प्रभावाने, भांडवली मूल्य नियम, २०१५ याची सुधारणा आणि त्याचा नियम २१ पुनर्अधिनियमित करणे.

४. (१) कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, इमारतींच्या किंवा जमिनींच्या वापरकर्त्यांच्या घटकांना व प्रवर्गांना (बहुविध भारांक देणे) भांडवली मूल्य निश्चित करणे नियम, २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "भांडवली मूल्य नियम, २०१५" असा केला आहे) यात, पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येतील आणि त्या सुधारणा, १ एप्रिल २०१५ पासून सुधारणा करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल :—

(क) भांडवली मूल्य नियम, २०१५ याच्या नियम २ मध्ये,—

(एक) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क-१) "दरांचे वार्षिक विवरणपत्र" याचा अर्थ, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदींन्वये केलेले महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम, १९९५ अन्वये प्रसिद्ध केलेले व त्या त्या वेळी अंमलात असलेले दरांचे वार्षिक विवरणपत्र, असा आहे;";

१९५८ चा ६०.

(दोन) खंड (ज) वगळण्यात येईल ;

(तीन) खंड (झ) मध्ये, "सिद्ध गणकामध्ये" या मजकुराऐवजी, "दरांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) भांडवली मूल्य नियम, २०१५ याच्या नियम १३ मधील, "सिद्ध गणकामध्ये" या मजकुराऐवजी, "दरांच्या वार्षिक विवरणपत्रामध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) भांडवली मूल्य नियम, २०१५ याचे नियम २० व २२ वगळण्यात येतील.

(२) कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, भांडवली मूल्य नियम, २०१५ याचा नियम २१ हा, विवक्षित फेरबदलांसह, यथोचितरीत्या व वैधरीत्या पुनर्अधिनियमित करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल, आणि तो, अंमलात असण्याचे कधीही बंद झालेले नव्हते असे मानण्यात येईल आणि तो, १ एप्रिल २०१५ पासून पुढीलप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील :—

"भांडवली मूल्य नियम, २०१५ याच्या नियम २१ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"**२१.** खुल्या जमिनीचे किंवा इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य.— खुल्या जमिनीचे किंवा इमारतीचे किंवा तिच्या भागाचे भांडवली मूल्य, अधिनियमाच्या कलम १५४ ची पोट-कलमे (१अ) व (१ब) यांच्या तरतुदी आणि हे नियम या अन्वये पुढील रीतीने निश्चित करण्यात येईल :—

(१) खुल्या जमिनीचे भांडवली मूल्य **(सीव्ही)**.—

दरांच्या वार्षिक विवरणपत्रानुसार खुल्या जमिनीचा सरासरी दर (आधारभूत दर-बीआर) × वापरकर्त्याच्या प्रवर्गानुसार (युसी) बहुविध भारांक (अनुसूची 'अ' चा भाग एक) × जमिनीचे क्षेत्रफळ (एएल).

सीव्ही = बीआर × युसी × एएल.

(२) इमारतीचे भांडवली मूल्य **(सीव्ही)**.—

दरांच्या वार्षिक विवरणपत्रानुसार, इमारतीचा सरासरी दर (आधारभूत दर-बीआर) × वापरकर्त्याच्या प्रवर्गानुसार (युसी) बहुविध भारांक (अनुसूची 'अ' चा भाग दोन, तीन, किंवा यथास्थिति, भाग चार) × इमारतीचे स्वरूप व प्रकार (एनटीबी) या नुसार (अनुसूची 'ब') बहुविध भारांक × इमारतीच्या वयानुसार (एएफ) बहुविध भारांक (अनुसूची 'क') × मजल्या नुसार (एफएफ) बहुविध भारांक (अनुसूची 'ड') × चटई क्षेत्र (सीए).

सीव्ही = बीआर × युसी × एनटीबी × एएफ × एफएफ × सीए.".".

५. (१) मुख्य अधिनियम किंवा त्या खाली केलेल्या नियमांमध्ये अथवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, १ एप्रिल २०१० रोजी पासून प्रारंभ होणाऱ्या आणि मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्य विषयक नियमांचे पुनर्अधिनियमन व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "सुधारणा अधिनियम" असा केला आहे) याच्या, प्रारंभाच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीमध्ये, मुख्य अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या भांडवली मूल्य नियम, २०१० व भांडवली मूल्य नियम, २०१५ यांच्या तरतुदींअन्वये महानगरपालिकेने किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी किंवा प्राधिकाऱ्यांनी आकारलेला, बसवलेला, मागणी केलेला, गोळा केलेला किंवा पुनर्विलोकन केलेला जमिनीच्या किंवा इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या भांडवली मूल्यावरील कोणताही मालमत्ता कर किंवा शास्ती अथवा महानगरपालिकेने असा मालमत्ता कर किंवा शास्ती आकारण्यासाठी, बसवण्यासाठी, मागणी करण्यासाठी, गोळा करण्यासाठी, किंवा पुनर्विलोकन करण्यासाठी केलेली किंवा करण्याचे अभिप्रेत असलेली किंवा केलेली कोणतीही कारवाई किंवा गोष्ट ही, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारित केल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या कलम १५४

विधिग्राह्यीकरण व व्यावृती.

२०२६ चा महा. ....

ची पोट-कलमे (१अ) व (१ब) आणि उक्त नियमांच्या तरतुदी ह्या, जणूकाही त्या सर्व वेळी सातत्याने अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार यथोचितरीत्या व वैधरीत्या करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल आणि त्या नेहमीकरिता करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल व त्या नुसार,—

(अ) असा मालमत्ता कर किंवा शास्ती आकारण्याच्या, बसविण्याच्या, मागणीच्या, गोळा करण्याच्या किंवा पुनर्विलोकन करण्याच्या संबंधात, महानगरपालिकेने किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी अथवा प्राधिकाऱ्यांनी केलेल्या सर्व कारवाया किंवा कार्यवाह्या किंवा केलेल्या गोष्टी ह्या, सर्व प्रयोजनांसाठी मुख्य अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार, करण्यात आलेल्या किंवा हाती घेण्यात आलेल्या कारवाया किंवा कार्यवाह्या किंवा केलेल्या गोष्टी असल्याचे मानण्यात येईल आणि त्या नेहमीकरिता करण्यात आल्या असल्याचे व केल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) अशा प्रकारे बसविलेल्या व गोळा केलेल्या कोणत्याही मालमत्ता करांच्या परताव्यासाठी महानगरपालिकेविरुद्ध किंवा तिच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा प्राधिकाऱ्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही अधिकाऱ्यासमोर अथवा प्राधिकाऱ्यासमोर कोणताही दावा किंवा अपील किंवा इतर कार्यवाह्या दाखल करण्यात येणार नाही किंवा चालविण्यात येणार नाही ;

(क) कोणतेही न्यायालय किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण, अशा प्रकारे बसविलेल्या व गोळा केलेल्या कोणत्याही मालमत्ता करांच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश बजावणार नाही ;

(ड) बसविलेल्या व गोळा केलेल्या मालमत्ता कराच्या कोणत्याही रकमेपैकी, प्रदान केलेली मालमत्ता कराची अधिक रक्कम, कोणतीही असल्यास, परत करण्यात येणार नाही आणि मुख्य अधिनियमान्वये देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेपोटी समायोजित करण्यात येईल.

(२) शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीचा, कोणत्याही व्यक्तीस,—

(अ) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता कराची किंवा शास्तीची आकारणी करण्यास, ती बसविण्यास, तिची मागणी करण्यास, ती गोळा करण्यास किंवा १८८८ चा ३.
तिचे पुनर्विलोकन करण्यास हरकत घेण्यापासून ; किंवा

(ब) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमान्वये मालमत्ता कराच्या स्वरुपात तिच्याकडून देय असलेल्या रकमेपेक्षा तिने अधिक प्रमाणात प्रदान केलेल्या कोणत्याही मालमत्ता कराच्या परताव्यासाठी दावा करण्यापासून,

प्रतिबंध होतो असा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

(३) मालमत्ता कराची कोणतीही रक्कम अधिक प्रमाणात प्रदान झाली असेल तर, ती देय मालमत्ता करामध्ये समायोजित करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

६. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१.]

[भूतलक्षी प्रभावाने, मुंबई महानगरपालिका अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता आणि भांडवली मूल्य निश्चित करणे, मालमत्ता कर बसविणे व गोळा करणे यांच्याशी संबंधित असणारे विवक्षित नियम पुनर्अधिनियमित करण्याकरिता विधेयक.]

[श्री. एकनाथ शिंदे,
उप मुख्यमंत्री (नगर विकास)]

[विधानसभेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]

[विधानपरिषदेने दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]

डॉ. विलास आठवले,
सचिव–३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई